## महत्त्वाचे

### वाघोडा ग्रामपंचायतचा अनोखा कार्यक्रम

**नांदगाव खंडेश्वर :** वाघोडा गावामधील गावकऱ्यांनी घरटॅक्स व पाणीकर भरण्यासाठी ग्रामपंचायत सरपंच जीविता जगताप यांनी गावातील महिला बचत गट यांच्यासाठी मागील तीन महिन्यांपूर्वी एक योजना जाहीर केली होती. ज्या बचत गटातील पूर्ण महिला घरटॅक्स व पाणीकर सर्वात पहिले भरतील, त्यांना ग्रामपंचायतमधून २५ हजार रुपयांचे बक्षीस देण्याची घोषणा केली व गावात दवंडी सुद्धा दिली. त्यानंतर गावातील सर्वच महिला बचत गटांनी सर्व महिलांना कर भरण्यास सांगितले व गावामधील दुर्गा माता बचत गटाच्या सर्व महिलांनी सर्वात आधी घरटॅक्स व पाणी कर भरून पहिला नंबर मिळविला.

## शक्ती व श्रेयस



युवा स्वाभिमान पक्षातर्फे मंगळवारी परतवाडा येथील बाजार समितीच्या मैदानावर दहीहंडी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. प्रसिद्ध अभिनेते शक्तिकपूर, मराठी अभिनेता श्रेयस तळपदे यावेळी प्रामुख्याने हजर झाले. त्यांनी नागरिकांशी संवाद साधून तालही धरला. यावेळी खासदार नवनीत राणा, आमदार रवी राणा, समाजसेवक चंद्रकुमार जाजोदिया यांच्यासह अन्य उपस्थित होते

### वाघाच्या हल्ल्यात गुराखी जखमी

**चिमूर :** तालुक्यातील ताडोबा बफर झोनअंतर्गत पळसगाव वनपरिक्षेत्रामधील विहीरगाव परिसरात गावातील जनावरे चराईकरिता नेलेल्या सुरेश बाजीराव ढोणे (५५) या गुराख्यावर दबा धरून बसलेल्या पट्टेदार वाघाने हल्ला करून जखमी केल्याची घटना रविवारी पळसगाव वनपरिक्षेत्रातील विहीरगाव बिट क्रमांक २ मध्ये घडली. जखमी सुरेश ढोणे याला पुढील उपचारासाठी जिल्हा रुग्णालय चंद्रपूर येथे हलविण्यात आले आहे. घटनास्थळी वनरक्षक बनकर, मेश्राम, गेडाम, अजय बन्सोड व वनमजूर यांनी धाव घेत पंचनामा केला. जखमीला तातडीची ५ हजारांची आर्थिक मदत देण्यात आली.

### लग्नाचे आमिष दाखवून महिलेवर अत्याचार

**अमरावती :** जलसंपदा विभागात कार्यरत एका ४० वर्षीय कर्मचाऱ्याने लग्नाचे आमिष दाखवून ३० वर्षीय महिलेवर अत्याचार केला. पीडित महिलेने या घटनेची तक्रार २० ऑगस्टला रात्री गाडगेनगर पोलिस ठाण्यात दिली. त्यानुसार पोलिसांनी गुन्हा दाखल करून आरोपीला अटक केली आहे. किशोर शंकर सहारे असे अटक केलेल्याचे नाव आहे. गाडगेनगर हद्दीतील एका महिलेची ओळख काही महिन्यांपूर्वी किशोर सहारेसोबत झाली. त्यानंतर ३० एप्रिलपासून दोघांमध्ये जवळीक निर्माण होऊन प्रेमसंबंध प्रस्थापित झाले. आता किशोरने लग्नासाठी नकार दिला, असा आरोप पीडित महिलेने तक्रारीतून केला आहे.

### बोडीत बुडून गुराख्याचा मृत्यू

**भंडारा :** बोडीत पडलेल्या शेळीच्या पिलाला वाचविण्यासाठी गेलेल्या गुराख्याचा पाण्यात बुडून मृत्यू झाल्याची घटना आंबाडी येथे घडली. बाळकृष्ण बागडे (५८) असे मृताचे नाव आहे. बाळकृष्ण बागडे हा नेहमीप्रमाणे घरच्या शेळ्या घेऊन आंबाडी ते भिलेवाडा येथील शेतशिवारात चारण्यासाठी गेला होता. आंबाडी लगतच्या गोसेखुर्द कॉलनी वसाहतीजवळ पाण्याने तुडूंब भरलेल्या बोडीत शेळीचे पिल्लू पडले. यावेळी बाळकृष्ण कपडे काढून बोडीत उतरून पिलाला बाहेर काढले. मात्र, त्याचा पाय घसरल्याने तो खोल पाण्यात गेला. यातच त्याचा बुडून मृत्यू झाला.

# आर्णीत युवकाचा खून, आरोपीला अटक

**आर्णी, २३ ऑगस्ट**

आर्णी बाजार समितीजवळ असलेल्या हॉटेलातील दोन नोकरांमध्ये मोबाईल चोरल्याच्या संशयावरून सोमवारी झालेल्या भांडणाचे पर्यावसान खुनात झाले आहे. या दोघांपैकी एकाने दुसऱ्याच्या डोक्यात तो झोपेत असताना दगड घालून गंभीर जखमी केले. उपचारादरम्यान तो मरण पावला. हॉटेल मालकाच्या तक्रारीवरून पोलिसांनी आरोपीला शोधून गजाआड केले.

हारून बेग यांच्या 'तूफान टी एव कोल्ड्रिंक' या हॉटेलात सहा नोकर काम करतात. त्यातील रिजवान बेग कयूम बेग व सय्यद बाबू सय्यद गफूर यांच्यासह इतर चार नोकर काम करतात. सोमवारी सकाळी सय्यद बाबू याने, रिजवान बेगचा मोबाइल मी चोरला असे म्हणून त्यावरून तो भांडण करीत आहे असे हॉटेलमालक बेग यांना सांगितले. त्यावेळी हे भांडण थांबले. पण रात्री रिजवान बेगच्या डोक्यात सय्यद बाबू सय्यद गफूर याने मोठा दगड घालून त्याला गंभीर जखमी केले. पोलिसांनी रक्तबंबाळ आणि बेशुद्धावस्थेतील रिजवानला आर्णी ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. पण त्याला पुढे यवतमाळ जिल्हा रुग्णालयात आणि नंतर सावंगी मेघे येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले. पण मंगळवारी दुपारी त्याचा मृत्यू झाला.

पोलिसांनी आरोपी सय्यद बाबूला ताब्यात घेतले. रात्रीच उपविभागीय पोलिस अधिकारी आदित्य मिरखेलकर व इतर पोलिस अधिकाऱ्यांनी घटनास्थळी भेट दिली. सहायक निरीक्षक गणपत काळुसे, उपनिरीक्षक किशोर खंडार, योगेश संकुलवार ठाणेदार पितांबर जाधव यांच्या मार्गदर्शनात अधिक तपास करीत आहेत. (तभा वृत्तसेवा)

## निवृत्तीवेतनधारकांचे उद्या धरणे आंदोलन

**यवतमाळ :** देशभरातील भविष्यनिर्वाह निधी कार्यालयावर गुरुवारी, २५ ऑगस्टला धरणे आंदोलन करण्यात येणार आहे. निवृत्तीवेतनवाढीकरिता पंतप्रधानांना निवेदन देण्यात येणार आहे. देशभरात १८४ उद्योगांतील ७२ लाख निवृत्तीवेतनधारकांना ८०० ते ३ हजार रुपये मासिक निवृत्तीवेतन मिळत असून त्यात महागाई भत्त्याची जोड नाही. वाढत्या महागाईच्या काळात या निवृत्तीवेतनधारकांना जीवन जगणे अशक्य झाले आहे. या संदर्भात गेल्या काही वर्षांपासून देशभरात आंदोलन सुरू आहे. मात्र, अद्याप काहीही झाले नसल्याने निवृत्तीवेतनधारकांमध्ये प्रचंड नाराजी आहे. याकरिता अकोला येथील भविष्यनिर्वाह निधी कार्यालयावर गुरुवारी, २५ ऑगस्टला सकाळी ११ ते दुपारी ३ वाजेदरम्यान धरणे आंदोलन करण्यात येणार असल्याची माहिती पुरुषोत्तम हरणे, कालिदास धोटे, मधुकर सायंकार, अशोक आसुटकर, हरिभाऊ गडलिंग यांनी केले आहे.

# क्रिष्णा बट्टूवार याच्यावर नागपुरात अन्त्यसंस्कार

**गडचिरोली, २३ ऑगस्ट**

सोमवारी (२२ ऑगस्टला) भिवापूरजवळ झालेल्या भीषण अपघातात सुनील बट्टूवार यांचा मुलगा क्रिष्णा बट्टूवार याचा जागीच मृत्यू झाला. त्याच्या मृत्यूने गडचिरोलीत सर्वत्र हळहळ व्यक्त करण्यात येत होती. सोमवारी नागपुरातील वोक्हार्ट रुग्णालयात क्रिष्णाचे शवविच्छेदन केल्यानंतर, मंगळवारी दुपारी ४ वाजताच्या सुमारास त्याच्या पार्थिवावर अन्त्यसंस्कार करण्यात आले.



क्रिष्णाची बहीण सायली ही आज सकाळीच दोहा येथून नागपुरात परत आली. तिने आईवडिलांना धीर दिला आणि डॉक्टरांच्या संमतीने सुनील बट्टूवार व त्यांच्या पत्नी वैशाली यांना अन्त्यसंस्काराकरिता नागपुरातील अंबाझरी येथील मोक्षधामात आणले. आईवडिलांच्या उपस्थितीतच क्रिष्णावर अन्त्यसंस्कार करण्यात आले. यावेळी बट्टूवार कुटुंबीयांचे आप्तेष्ट आणि मोठ्या संख्येने मित्रमंडळी उपस्थित होते. अतिशय शोकाकुल वातावरणात क्रिष्णाला निरोप देण्यात आला. येथील स्कूल ऑफ स्कॉलर्समध्ये दहाव्या वर्गात शिकणाऱ्या क्रिष्णाला शाळेतही साश्रुनयनाने श्रद्धांजली वाहण्यात आली. (तभा वृत्तसेवा)

# चितळाच्या अवयवांची तस्करी, पाच जणांना अटक

**वरोडा, २३ ऑगस्ट**

चितळाच्या अवयवांची विक्री होणार असल्याची गोपनीय माहिती वनविभागास मिळाली. वनविभागाने बनावट ग्राहक पाठवून सौदा पक्का केला. त्यानंतर संशय आल्याने आरोपी वाहनाने शेगावकडे पळाले. वनविभागाने शेगाव पोलिसांना सूचना दिली. पोलिसांनी ते वाहन अडवले व वाहनासह पाच व्यक्तींना अटक करून वनविभागाच्या ताब्यात दिले.

एमएच ३४ ए २९०४ या क्रमांकाच्या स्कार्पिओ वाहनाने आलेले ते पाचही व्यक्ती गुजगवान गावानजीकच्या एका बिअर बारमध्ये बसले होते. हे पाचही व्यक्ती चितळाचे शिंगे विकण्याच्या तयारीत असल्याची माहिती वनविभागाला मिळाली. वनविभागाने त्यांच्याजवळ बनावट ग्राहक पाठविला. सौदा पक्का झाला. परंतु, त्या पाचही व्यक्तींना संशय आल्याने त्यांनी मुद्देमाल शेगावमध्ये ठेवला असल्याने शेगावमध्ये जावे लागेल, असे म्हणत आपले वाहन भरधाव वेगाने घेऊन निघाले. त्यांच्या मागे वनविभागाच्या अधिकाऱ्यांचे वाहन होते.

वनविभागाने शेगाव पोलिसांना याबाबत माहिती दिली. शेगाव पोलिसांनी ते स्कार्पिओ वाहन नाकाबंदी करून अडविले. वाहनामधील अनिकेत सतीश श्रीवास्तव, नितीन जयस्वाल, मुधोळ मुकुंद खोडे, विजय शंकरदेवनारायण पाठक, राहुल सुभाष खोब्रागडे यांना शेगाव पोलिसांनी वनविभागाच्या ताब्यात दिले. पुढील तपास चिमूर वनपरिक्षेत्र अधिकारी उद्धव नैताम, किशोर देऊळकर, मधुकर राठोड करीत आहेत. (तभा वृत्तसेवा)

## देशी कट्ट्यासह युवकास अटक

**अमरावती :** देशी कट्टा बाळगणाऱ्या युवकास अटक करून त्याच्याजवळून कट्टा जप्त करण्यात आला. गुन्हे शाखेच्या पथकाने मंगळवारी गाडगेनगर पोलिस ठाण्याच्या हद्दीत ही कारवाई केली. शेख मोहसीन शेख सलीम असे या प्रकरणात अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. पोलिस



आयुक्तालयातील गुन्हे शाखेच्या पथकास मंगळवारी गस्त घालत असताना महेंद्र कॉलनी येथील एका पानटपरीसमोर एका व्यक्तीजवळ अग्निशस्त्र (पिस्तूल) असल्याची माहिती मिळाली होती. या माहितीवरून पोलिसांनी शेख मोहसीन यास ताब्यात घेतले. त्याच्याजवळ त्यांना एक गावठी बनावटीची स्टील, लोखंडी धातूची पिस्तूल (कट्टा) आढळून आली. या अग्निशस्त्राची किंमत ३० हजार रुपये आहे. पोलिसांनी शेख मोहसीन शेख सलीम यास अटक केली. त्याच्यावर गाडगेनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. ही कारवाई गुन्हे शाखेचे निरीक्षक अर्जुन ठोसरे यांच्या नेतृत्वात उपनिरीक्षक नरेशकुमार मुंढे व पथकाने केली.

## १.२९ लाखांनी ऑनलाईन फसवणूक

**वरूड, २३ ऑगस्ट**

शहरातील जिजाऊनगर परिसरातील एका युवकाची १ लाख २९ हजार ४५४ रुपयांनी कुण्यातरी अज्ञात व्यक्तीने ऑनलाईन फसवणूक केल्याची घटना नुकतीच उघड झाली असून याबाबत वरूड पोलिसांत तक्रार दाखल करण्यात आली आहे.

तक्रारकर्त्याच्या मुलाला अज्ञात आरोपीने व्हॉट्सअप व टेलिग्राम या सोशल मीडियाचा वापर करून तीस मिनिटात पैसे तिप्पट करून देतो, असे आमिष दाखवले व त्याने पाठविलेल्या मोबाईल नंबरवर युवकास पेटीएमवर पैसे पाठविण्यास सांगितले.



त्यानंतर आरोपीने केवळ तीस मिनिटात तक्रारकर्त्याच्या पत्नीच्या खात्यातून १ लाख २९ हजार ४५४ रुपये ऑनलाईन पद्धतीने रक्कम काढल्याची घटना १५ ऑगस्ट रोजी घडली होती. आरोपीच्या मोबाईलवर फिर्यादीच्या मुलाने वारंवार संपर्क केल्यानंतर आरोपीने फिर्यादीच्या मुलाला कोणताच प्रतिसाद न दिल्यामुळे फिर्यादी मुजफ्फर खलील शेख रा. वरुड यांनी पोलिसात २२ ऑगस्ट रोजी या संदर्भात तक्रार दाखल केली. वरुड पोलिसांनी या संदर्भात गुन्हा दाखल केला पुढील तपास सुरू आहे. या संदर्भात सायबर पोलिसांची मदत घेतली जात आहे. (तभा वृत्तसेवा)

# जुनैद मोहम्मद व त्याच्या साथीदारांना पुण्यात अटक

## दिल्ली व उत्तरप्रदेशात हल्ल्याचा कट उघडकीस

**पुणे, २३ ऑगस्ट**

दिल्ली व उत्तरप्रदेशात मोठा हल्ला करण्याच्या तयारीत असलेल्या जुनैद मोहम्मद व त्याच्या साथीदारांचा कट महाराष्ट्राच्या दहशतवादविरोधी पथकाने मंगळवारी उघडकीस आणला आहे. संशयित दहशतवादी जुनैद मोहम्मद आणि त्याचे साथीदारांना पुण्यात अटक करण्यात आली.

अटक करण्यात आलेले दहशतवादी दिल्ली व उत्तर प्रदेशातील नरसिंहानंद सरस्वती, गायक संदीप आचार्य आणि जितेंद्र नारायण उर्फ वसीम रिजवी या तीन प्रमुख लोकांवर हल्ला करण्याच्या तयारीत होते. तसेच त्यांनी उत्तर भारतात आगामी काळात होणाऱ्या भाजपाच्या रॅलीवरसुद्धा हल्ला करण्याची योजना आखली होती. (वृत्तसंस्था)

## ग्रामपंचायत भिलगाव, ता. कामठी, जि. नागपूर

### ई-निविदा सूचना क्र. ३ सन २०२२-२३ (मुदतवाढ)

सर्व अधिकृत साहित्य पुरवठादारास सूचित करण्यात येते की, सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात साहित्य आवश्यकतेनुसार पुरवठा करण्याकरिता ई-निविदा मागविण्यात येत आहे.

| निविदा तपशील | दरपत्रक विक्रीचा दि. | दरपत्रक स्विकृत दि. |
|---|---|---|
| सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात सामान्य फंड (स्व. निधी) अंतर्गत दिवाबत्ती साहित्य आवश्यकतेनुसार पुरवठा करणे. | दि. ११/०८/२०२२ ते दि. २५/०८/२०२२ ला सायंकाळी ०५ वाजेपर्यंत | दि. ११/०८/२०२२ ते दि. २६/०८/२०२२ ला सायंकाळी ०४ वाजेपर्यंत |
| सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात सामान्य फंड (स्व. निधी) अंतर्गत व पाणी पुरवठा निधी अंतर्गत पाईप लाईन दुरुस्ती व इतर कामाकरिता लागणारे साहित्य आवश्यकतेनुसार पुरवठा करणे. | | |
| सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात १५ वा वित्त आयोग योजना अंतर्गत पाणी पुरवठा दुरुस्ती व इतर कामाकरिता लागणारे पाणीसाहित्य आवश्यकतेनुसार पुरवठा करणे. | | |

निविदेतील अटी, शर्ती, शुद्धिपत्रक, निविदा फी, अनामत रक्कम इत्यादी माहिती **mahatenders.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. **निविदा शक्यतो दि. २७/०८/२०२२ ला** किंवा ग्रा.पं. कमिटीनी ठरवलेल्या दिनांकास उघडण्यात येईल.

**सरपंच**
**ग्रामपंचायत, भिलगाव**

**सचिव**
**ग्रामपंचायत, भिलगाव**

## दक्षिण पूर्व मध्य रेल्वे

### अभियांत्रिकी कामांसाठी निविदा सूचना

**(१) निविदा सूचना क्रमांक : ई-आर-टी-४८-२२-२३, दिनांक: १३.०८.२०२२.**
**कामाचे नाव:** बिलासपूर-दुर्ग विभागातील गर्डर पुलांवर संरेखन अनुचर (अलाइनमेंट रिटेनर) ची तरतूद. निविदा मूल्य: ₹ २९,४२,२७९/-
बयाणा रक्कम : ₹ ५८,९००/-

**(२) निविदा सूचना क्रमांक : ई-आर-टी-४९-२२-२३, दिनांक : १३.०८.२०२२.**
**कामाचे नाव :** एडीईएन/१/ भिलाईच्या अखत्यारीतील रेल्वे साहित्य वाहून नेण्यासाठी ४.५ मेट्रिक टनचे दोन ट्रक आणि १.० मेट्रिक टनचे दोन ट्रक (एक एसएसई/पी.वे./भिलाईसाठी आणि दुसरा एसएसई/पी. वे./रायपूरसाठी) दोन वर्षांसाठी भाड्याने घेणे. निविदा मूल्य : ₹ ५८,२८,३९८/-.
बयाणा रक्कम : ₹ १,१६,६००/-.

**(३) निविदा सूचना क्रमांक : ई-आर-टी-५०-२२-२३, दिनांक : १३.०८.२०२२.**
कामाचे नाव : एडीईएन/ भाटापाराच्या अधिकार क्षेत्रात रेल्वे साहित्य वाहून नेण्यासाठी ४.५ मेट्रिक टनचे दोन ट्रक आणि १.० मेट्रिक टनचे दोन ट्रक (प्रत्येकी एक एसएसई/ पी.वे./भाटापारा आणि दुसरा एसएसई/पी. वे./ तिल्दासाठी आहे) दोन वर्षांसाठी भाड्याने घेणे. **निविदा मूल्य :** ₹ ५९,८८,०४३/- **बयाणा रक्कम :** ₹ १,१९,८००/-

निविदा सादर करण्याचा दिनांक : १५.०९.२०२२ रोजी ११.०० वाजेपर्यंत. निविदा उघडण्याची तारीख : १५.०९.२०२२ रोजी ११.०० वाजता

संपूर्ण माहिती/ निविदा दस्तऐवजची विक्री, पात्रतेचे निकष आणि अन्य विस्तृत तपशीलांसाठी कृपया वरिष्ठ विभागीय अभियंता (समन्वय) दक्षिण पूर्व मध्य रेल्वे, रायपूर यांच्या कार्यालयाशी संपर्क साधावा किंवा निविदा दस्तऐवज जे आमच्या वेबसाईट **www.ireps.gov.in** वर उपलब्ध आहेत त्याद्वारे डाउनलोड करू/पाहू शकता

**वरिष्ठ विभागीय अभियंता (लाईन-।)/ रायपूर**
पीआर/आर/इंजी/एफएल/101
South East Central Railway @secrail

## kotak कोटक महिंद्रा बँक लि.

येथे नोंदणीकृत कार्यालय: २७बीकेसी, सी २७, जी ब्लॉक, वांद्रे-कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (ई), मुंबई - ४०००५१ (महाराष्ट्र)
येथे शाखा: कोटक महिंद्रा बँक लि., कृषी व्यवसाय समूह, ४था मजला, झोन ।।।, न्याती युनिटरी, पुणे-अहमदनगर रोड, येरवडा, पुणे -४११००६

सुरक्षा व्याज (अंमलबजावणी) नियम, २००२ च्या नियम ८(६) च्या तरतुदीसह वाचलेल्या आर्थिक मालमत्तेचे सिक्युरिटायझेशन आणि रिकन्स्ट्रक्शन आणि एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना.

सामान्यत: जनतेला आणि विशेषतः कर्जदार(ते) आणि जामीनदार/गहाणदारांना जे खाली वर्णन केलेल्या स्थावर मालमत्ता कोटक महिंद्रा बँक लिमिटेड (सुरक्षित कर्जदार) कडे गहाण/शुल्क आकारले आहेत, ज्याचा भौतिक ताबा आहे. २४/०१/२०२२ रोजी सुरक्षित कर्जदाराच्या प्राधिकृत अधिकाऱ्याने घेतलेले, जसे आहे तसे, जसे आहे तसे, आणि जे काही आहे आणि 'कोणताही आधार नाही' अशा निविदा मागवून विकले जाईल. १,४०,४६,३५६/- (रु. एक कोटी चाळीस लाख, छेचाळीस हजार तीनशे छप्पन फक्त) च्या वसुलीसाठी १३.०९.२०२२ रोजी आधारावर २३/०१/२०२२ रोजी पुढील व्याज, खर्च, शुल्क आणि त्यावरील खर्च २३/०१/२०२२ पासून कर्ज घेतलेल्या सुरक्षित कर्जदारामुळे मेसर्स. के एम खंडेलवाल (त्याचे मालक श्री. अशोक आर. खंडेलवाल यांनी प्रतिनिधित्व केलेले, २८२, विद्या भवन, क्रोडक रोड, नेहरू पुतळ्याजवळ, अनाज बाजार, इतवारी, नागपूर -४४०००१ येथे राहणारे, २. श्रीमती तरुणा अशोक खंडेलवाल (जामीनदार) फ्लॅट क्रमांक ४ सी, इमारत क्रमांक बी/१/२, चौथा मजला, निर्मल नगरी नागपूर- ४४०००१ आणि ३. श्री. विनोद एस. खंडेलवाल (जामीनदार), ४. श्रीमती शालिनी विनोद खंडेलवाल (जामीनदार) या पाचव्या मजल्यावरील निर्मल नगरी, नागपूर येथील रहिवासी आहेत. मालमत्तेचे वर्णन, राखीव किंमत (ज्या खाली मालमत्ता विकल्या जाणार नाहीत) आणि बयाणा रक्कम ठेव यासंबंधीचे तपशील खालील तक्त्यामध्ये अधिक विशेषतः नमूद केले आहेत.

**मालमत्तेची शेड्यूल**

मालमत्ता क्रमांक १ मालमत्ता श्री. अशोक आर खंडेलवाल आणि श्रीमती तरुणा अशोक खंडेलवाल यांच्या मालकीची संपूर्ण आरसीसी अपार्टमेंट क्रमांक ४सी (३०३), चौथ्या मजल्यावर बांधलेले क्षेत्रफळ ७४.५६ चौ.मीटर, इमारत क्रमांक बी/१/२ मध्ये अविभाजित ०.१२४७% भू-बेअरिंग घर क्रमांक ३०११/एए, केएच नं २०,१८/१,२ मध्ये अविभाजित असलेला सुपरस्ट्रक्चर ,२ वार्ड क्रमांक २० सीएस क्रमांक ५५३ , ६४९/१ , ६४९/३ , शीट क्रमांक ३६५/२१, ३६२/३१, १७८/२९, एडीएम ७०४४५.२०७ चौरस मीटर, मौजा हरपूर, ता. व जिल्हा नागपूर. कॅप्शन दिलेल्या मालमत्तेची सीमा खालीलप्रमाणे आहे:- पूर्वेकडे किंवा दिशेने: डीपी रोड, पश्चिमेकडे किंवा दिशेने: मध्य रिंगरोड, उत्तरेकडे किंवा दिशेने: प्रस्तावित डीपी रोड, दक्षिणेकडे किंवा द्वारे: खसरा क्रमांक १६ सर्व फिक्स्चर आणि फिटिंग्ज, इमारती आणि संरचना जमिनीला जोडलेल्या किंवा जमिनीशी संलग्न असलेल्या कोणत्याही गोष्टीला कायमस्वरूपी जोडलेल्या, वर्तमान आणि भविष्यकाळ आणि त्यासोबत जोडलेले सर्व सुलभ/मामूल अधिकार एकत्र.

**विक्रीचे तपशील**

| | |
|---|---|
| निविदा उघडण्याची तारीख आणि वेळ | १३.०९.२०२२ रोजी सकाळी ११:०० वाजता |
| वरील मालमत्तेच्या अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या स्थावर मालमत्तेसाठी राखीव मूल्य | मालमत्ता क्रमांक १ : रु. ४०,००,०००/- (रु. चाळीस लाख फक्त) |
| बयाणा ठेव रक्कम | मालमत्ता क्रमांक १ : रु. ४,००,०००/- (रु. चार लाख फक्त) |
| निविदा उघडण्याचे ठिकाण | www.AuctionTiger.net |

**ई-लिलावाद्वारे स्थावर मालमत्तांच्या विक्रीच्या अटी आणि शर्ती:-** मालमत्तेची तपासणी: इच्छुक पक्ष १२.०९.२०२२ रोजी सकाळी ११ ते दुपारी ३ या वेळेत मालमत्तांची तपासणी करू शकतात. ईएमडी सादर करण्याची शेवटची तारीख आणि वेळ १२.०९.२०२२ संध्याकाळी ५ पर्यंत.

१. लिलाव विक्री केएमबीएलच्या मान्यताप्राप्त सेवा पुरवठादार मेसर्स ऑक्शन टायगर मार्फत ऑनलाइन ई-लिलाव/बिडिंग असेल, ज्याचे कार्यालय अहमदाबाद, गुजरात-३८०००६, हेल्प लाइन क्रमांक श्री. प्रवीण कुमार फोन नंबर ७९६१२००५१५ /९७२२७७८८२८ आहे. आणि **www.AuctionTiger.net** या वेबपोर्टलवर **sales@AuctionTiger.net** मेल आयडी हेल्प लाइन.
२. लिलाव विक्री १३.०९.२०२२ रोजी सकाळी ११:०० ते दुपारी १२:०० दरम्यान स्वयं-विस्तारांसह ५ (पाच) मिनिटांसाठी आयोजित केली जाईल, जर नियोजित बंद वेळेपूर्वी शेवटच्या पाच मिनिटांत बोली लावली गेली असेल.
३. सादर करावयाची बोली किंमत, अधिकृत अधिकाऱ्याने (एओ) निश्चित केलेल्या राखीव किमतीपेक्षा जास्त असेल आणि बोलीदार त्यांच्या ऑफरमध्ये आयएनआरच्या पटीत सुधारणा करेल. ५०,०००/- (रुपये पन्नास हजार फक्त).
४. एओने सेट केलेल्या राखीव किमतीपेक्षा खाली मालमत्ता विकली जाणार नाही. राखीव किमतीच्या खाली उद्धृत केलेली बोली नाकारली जाईल आणि जमा केलेला ईएमडी जप्त केला जाईल.
५. यशस्वी बोली लावणाऱ्याने ई-लिलाव विक्री प्रक्रिया बंद झाल्यापासून २४ तासांच्या आत आधीच भरलेल्या खरेदीच्या रकमेच्या २५ टक्के (बयाणा रकमेसह) भरावे लागतील. खरेदी किमतीच्या ७५ टक्के शिल्लक बँकेने विक्रीची पुष्टी केल्याच्या १५ (पंधरा) दिवसांच्या आत किंवा एओच्या विवेकबुद्धीनुसार लिखित स्वरूपात मान्य केल्यानुसार अशा विस्तारित कालावधीत भरणे आवश्यक आहे, असे न केल्यास बँक खरेदीदाराने आधीच भरलेली/जमा केलेली रक्कम जप्त करेल आणि एओला पुढील सर्वोच्च बोलीदाराला विक्रीची पुष्टी करण्याचा अधिकार आहे. .
६.बिडर्सना सूचित केले जाते की त्यांनी बिड फॉर्मसाठी www.AuctionTiger.net या वेबसाइटला भेट द्यावी आणि त्यांच्या बिड सबमिट करण्यापूर्वी आणि कार्यवाहीमध्ये भाग घेण्यापूर्वी विक्रीच्या तपशीलवार अटी व शर्ती पहा.
७.बिड फक्त विहित नमुन्यात ऑनलाइन सादर केल्या जातील. संबंधित तपशील योग्यरित्या भरलेले असतील. इतर कोणत्याही स्वरूपात सादर केलेल्या बोली/अपूर्ण बोली नाकारल्या जातील.
८. सर्व बिड फॉर्म खालील केवायसी कागदपत्रांच्या प्रतींसह असतील उदा., (i) पॅन कार्ड (ii) आधार कार्ड/पासपोर्ट (iii) वर्तमान पत्ता पुरावा (iv) वैध ई-मेल आयडी (v) संपर्क क्रमांक (मोबाइल/लँडलाईन), इ. वर नमूद केलेल्या ई-मेल आयडीवर नमूद केलेल्या कागदपत्रांच्या स्कॅन केलेल्या प्रती सबमिट केल्या जातील. सोबतच्या विक्री सूचनेमध्ये वर्णन केलेल्या मालमत्तेवर नमूद केल्यानुसार अर्नेस्ट मनी डिपॉझिट (ईएमडी) ऑनलाईन बोली सबमिट करण्यापूर्वी खालील खात्यात आरटीजीएस/एनईएफटी/फंड ट्रान्सफर/ द्वारे जमा केले जाईल.

| तपशील | तपशील |
|---|---|
| बँक आणि शाखेचे नाव | कोटक महिंद्रा बँक |
| लाभार्थीचे नाव | कोटक महिंद्रा बँक लिमिटेड |
| खाते क्रमांक | डीडीद्वारे |
| आयएफएससी कोड | केकेबीके०००२०५० |

९. इच्छुक बोलीदाराने बँकेला ईएमडी जमा केल्याचा पुरावा बँकेला मान्य असेल, त्या स्वरूपात सादर करावा.
१०. बोलीदारांनी वैध ई-मेल आयडी धारण केला पाहिजे. कारण सुरक्षित कर्जदार/सेवा प्रदात्याकडून सर्व संबंधित माहिती फक्त ई-मेलद्वारे कळविली जाऊ शकते.
११. ई-लिलावात सहभागी होण्यासाठी ऑनलाईन/व्यक्तिगत प्रशिक्षणाचा लाभ घेण्यासाठी संभाव्य इच्छुक बोलीदार वर नमूद केलेल्या तपशिलावर सेवा प्रदात्याशी संपर्क साधू शकतात.
१२. तथापि, अधिकृत अधिकारी किंवा सुरक्षित कर्जदार किंवा सेवा प्रदाता कोणत्याही तांत्रिक त्रुटी/खंडित वीज पुरवठा आदींसाठी जबाबदार असणार नाहीत.
१३. ई-लिलावाची कार्यवाही बंद झाल्यापासून कामकाजाच्या १५ दिवसांच्या आत अयशस्वी बिडर्सचा ईएमडी परत केला जाईल.
१४. विक्री बँकेच्या पुष्टीकरणाच्या अधीन आहे. कर्जदार/जामीनदारांनी ई-लिलावाच्या नियुक्त तारखेपूर्वी आणि वेळेपूर्वी सुरक्षित कर्जदाराची संपूर्ण रक्कम भरल्यास कोणतीही विक्री केली जाणार नाही.
१५. उत्तम माहिती आणि माहितीनुसार, उपरोक्त मालमत्तेवर इतर कोणतेही बंधने अस्तित्वात नाहीत, तथापि संभाव्य निविदाकारांना सूचित केले जाते की, त्यांनी स्वतःचे योग्य परिश्रम करावे आणि शीर्षक/भार आदी संदर्भात स्वतंत्र चौकशी करावी. उपरोक्त गहाण ठेवलेल्या मालमत्तेच्या संदर्भात कोणतेही शुल्क, धारणाधिकार, बोझा, मालमत्ता कर किंवा सरकारच्या कोणत्याही देयांसाठी एओ जबाबदार राहणार नाही आणि उपरोक्त गहाण मालमत्तेच्या संदर्भात कुणीही. मालमत्तेची विक्री सध्याच्या आणि भविष्यातील सर्व भारांसह केली जात आहे, मग ती सुरक्षित कर्जदाराला ज्ञात असो वा नसो.
१६. एओला कोणतीही निविदा/निविदा नाकारण्याचा किंवा कोणतेही कारण न देता ई-लिलाव रद्द करण्याचा अधिकार आहे.
१७. विक्रीच्या अटींचे पालन केल्यावर एओ खरेदीदाराच्या नावे विक्रीचे प्रमाणपत्र जारी करतील. मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क, वाहतूक, व्हॅट, टीडीएस, जीएसटी इत्यादींशी संबंधित सर्व खर्च खरेदीदाराकडून उचलले जातील.
१८. सदर विक्री सरफेसी कायदा/नियम, २००२ आणि वर नमूद केलेल्या अटींच्या अधीन आहे.
१९. मालमत्तेच्या तपासणीसह लिलावाच्या कोणत्याही अधिक माहितीसाठी अभिप्रेत निविदाकार श्री. दुष्यंत सिंह झाला यांच्याशी फोन नंबर ९०९९०९१२६२, वीर अनुराग फोन ९१६८६४७५७४, श्री. मयूर पगारे यांच्याशी फोन नंबर ९७०२६४३०५३ यावर सर्व कामकाजाच्या दिवशी सकाळी १० ते सायंकाळी ५ या दरम्यान संपर्क साधू शकतात.

**दिनांक : २३.०८.२०२२**
**ठिकाण : नागपूर**

**स्वाक्षरी**
**अधिकृत अधिकारी**
**कोटक महिंद्रा बँक लि.**

## CSB Bank

### PUBLIC NOTICE ON AUCTION OF PLEDGED GOLD ORNAMENTS

The borrower/s in specific and interested bidders in general are hereby informed that on account of non-repayment of Bank's dues by the borrowers as under despite the payment notice and recall/auction notice issued by the Bank, the gold ornaments pledged with the bank as security by the respective borrowers for the loans availed by them will be sold in public auction on "as is where is" and "non- recourse" basis through e-auction portal http://csbgold.auctiontiger.net on 29th August, 2022 at 03:00 p.m . The auction may be adjourned to any other later date at the discretion of the bank upon publication of the same in the Bank's notice board. The borrowers are hereby further informed that the gold ornaments will be disposed off by private sale if the public auction is not successful and if there is a further balance to be recovered thereafter, legal action will be initiated against the borrower/s for recovery of the balance amounts due to the bank.

| S.No. | Branch Name | Account Name | Client ID | No of Acc. | Bal Outstanding as on 20-08-2022 | Weight (grams) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Amravati | SACHIN LAXMAN PINJARKAR | 4021628 | 1 | 165356.15 | 41.23 |
| 2 | Amravati | ROSHAN ANAND BHOPLE | 4345197 | 1 | 57355.22 | 14 |
| 3 | Amravati | BHAVIKA ASHISH JOSHI | 7267670 | 1 | 69270.61 | 17.9 |

For more details/account wise information borrowers/interested bidders may contact respective branches and for participating in the auction, please visit/login to the e-auction portal http://csbgold.auctiontiger.net

**Authorised Officer**
**CSB Bank**

Amravati I 23rd August 2022

## ग्रामीण पाणी पुरवठा विभाग जिल्हा परिषद, नागपूर

### ई-निविदा सूचना क्र. ७२ सन २०२२-२३ (दुसरी वेळ)

### जल जीवन मिशन सन २०२१-२२

जल जीवन मिशन अंतर्गत खालीलप्रमाणे एकूण ०४ कामांची ई-निविदा ग्रापापुवि, जि.प. नागपूरकडून प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. सदर ई-निविदा **www.mahatenders.gov.in** या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

१. मौजा दुधा, ता. उमरेड येथील नळ योजना
२. मौजा किहळा, ता. उमरेड येथील नळ योजना
३. मौजा सांडीगोंडी, ता. उमरेड येथील नळ योजना
४. मौजा डव्हा, ता. उमरेड येथील नळ योजना

दिनांक :

स्वा/-
**कार्यकारी अभियंता**
**ग्रापापुवि, जि.प. नागपूर**

स्वा/-
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद, नागपूर**

क्र.जिपना/ग्रापापुवि/४९१६/२०२२, दिनांक २३/०८/२०२२